**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस. ०३१९/प्र.क्र.९२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (एच १) च्या उपखंड (दोन) यासह पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेला अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ च्या नियम ६ मध्ये,

(अ) पोट-नियम (२४) मधील, " वैधानिक इशारा मद्य सेवन हे आरोग्यास हानीकारक आहे " हे शब्द वगळावेत.

(ब) पोट-नियम २४ नंतर पुढील पोटनियम समाविष्ट करण्यात येईल :-

" २४ (अ) सर्व देशी मद्याच्या बाटल्या/आवेष्टके यांच्या प्रत्येक लेबलवर अन्न सुरक्षा आणि प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांनी वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे व नमुन्यामध्ये वैधानिक इशारा " मद्य सेवन आरोग्यास हानीकारक आहे. सुरक्षित रहा- मद्य सेवन करून वाहने चालवू नका " असे मुद्रीत करण्यात येईल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 19th September 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.MIS. 0319/CR 92/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (ii) of clause (h 1) of sub-section *(2)* read with the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend Maharashtra Country Liquor Rules, 1973 as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2019.

2. In rule 6 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973,—

(a) in sub-rule (24), the words "statutory warning consumption of liqour is injurious to health" shall be deleted ;

(b) after sub-rule (24), the following sub-rule shall be inserted, namely :—

"(24A) A statutory warning "Consumption of Alcohol is injurious to health. Be safe— Don't Drink and Drive" in the format and as prescribed by the Food Safety and Standards Authority of India (FSSAI) from time to time shall be printed on every label of all bottles or containers of country liquor."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,

Joint Secretary to Government.